# डॉ. गंगाधर मद्दीवार - एका संपन्न आयुष्याचा सोहळा...




दिनांक मे २४, २०२३ रोजी अमेरिकन पूर्व वेळेप्रमाणे संध्याकाळी ०७:३५ मिनिटांनी आपल्या सर्वांचे लाडके 'काका' डॉ. गंगाधर मद्दीवार ह्यांना देवाज्ञा झाली. अलीकडे काही काळ त्यांना फुफ्फुसांची असाध्य व्याधी जडली होती. त्याबद्दल त्यांनी वेळोवेळी 'माझा मराठीचा बोल (मामबो)' ह्या मराठी साहित्यिक समूहावर लेखनही केलेलं आहे. मृत्यूशी अत्यंत धीराने त्यांनी सामना केला आहे. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी त्यांची मन, बुद्धी आणि लेखणी तल्लख ठेवली होती. एका शूर आणि दानशूर योध्याच्या संपन्न आयुष्याचा सोहळा आज आपण त्यांना मानवंदना देऊन साजरा करूया.

पाच वर्षांपूर्वी आम्ही काही मित्र-मैत्रिणींनी डॉ. मद्दीवार काका आणि सौ. सुरेखाताई ह्यांच्या बॅनर (केंटकी राज्य) ह्या गावातल्या त्यांच्या राजेशाही घरात, म्हणजे महालात काही दिवस एकत्र घालवले होते. त्यावेळी काढलेली काही क्षणचित्रं इथे जोडली आहेत. डॉक्टर काका आणि सुरेखाताईंचा प्रेमळ पाहुणचार अजूनही आम्हाला आठवतो. डॉक्टर काका म्हणजे आयुष्य अत्यंत रसिकपणे जगणारा एक अतिशय उत्साही, उमदा माणूस. स्वकष्टाने कमावलेली त्यांची संपत्ती त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रमांना दान दिली आहे. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेंच करी' ह्या संत तुकारामांच्या वचनाचं डॉ. मद्दीवार हे एक परिपूर्ण उदाहरण! अगदी अलीकडे त्यांनी एक लाख अमेरिकन डॉलर्स दान देऊन 'मद्दीवार हाऊस ऑफ होप' अशा एका घराची स्थापना केली आहे. बॅनर गावाच्या निराधार लोकांना इथे डोकं टेकायला जागा मिळते, अन्न-पाणी मिळतं, कपडे मिळतात,

औषधं मिळतात. डॉ. मद्दीवार ह्यांच्या भारतातल्या मूळ 'अहेरी' गावी त्यांनी शाळा सुरु केली आहे. डॉ. मद्दीवार ह्यांचं आयुष्य हे इतर लोकांना आधारवड झालेलं आहे. आमच्या सारख्या त्यांच्या मागून येणाऱ्या अमेरिकन भारतीय पिढीला डॉ. मद्दीवार हे दीपस्तंभासारखे योग्य दिशा दाखवणारे झालेले आहेत.



डॉक्टर काकांनी सातत्याने त्यांच्या आयुष्यातल्या महत्वाच्या घटना लेख लिहून आपल्यापर्यंत पोचवल्या आहेत. डॉक्टर मद्दीवारांनी कशासाठी...कुणासाठी अँड स्वान्त सुखाय असे दोन लेखसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. 'मी लेखक नाही. मी योद्धा नाही. मी आहे एक सर्जन' असं त्यांचं स्वतःबद्दल मत होतं. पण तरीसुद्धा श्री. सुधीर फडके ह्यांच्याबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा, प्रेम आणि आदर त्यांच्या लेखनातून आणि बोलण्यातून सतत कळत होता. त्यांचा स्वतःचा गाण्याचा गळा चांगला होता. एक उत्तम सर्जन असूनही त्यांनी कलाप्रेम जोपासलं होतं. अमेरिकन मिलिटरीमध्ये काम करून त्यांनी मध्यपूर्वेतील कुवेत/इराकच्या गल्फ वॉरमध्ये अमेरिकेतर्फे भाग घेतला होता. नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतरही श्री. स्टॅन ब्रॉक ह्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी रिमोट एरिया मेडिकल (रॅम) कोअर ह्या संस्थेचे मुख्य आणि नियमित सभासद म्हणून अनेक देशात मेडिकल कॅम्प करून अनेक दशकं मोफत रुग्णसेवा पुरवली आहे. इतकं यशस्वी, वैविध्यपूर्ण आणि वेळोवेळी निस्वार्थीपणे समाजसेवेत व्यतीत होणारं डॉ. मद्दीवार ह्याचं आयुष्य हा एक आदर्श जीवनाचा वस्तुपाठ ठरायला हवा. डॉ. मद्दीवार हे माझ्या मते आधुनिक काळातले कर्मयोगी संतच आहेत.




मी स्थापन केलेल्या "माझा मराठीचा बोल (मामबो)" ह्या मराठी लेखक वाचकांच्या जागतिक समूहाला डॉ. मद्दीवार ह्यांनी जणूकाही आपल्या कुटुंबात प्रेमाने सामावून घेतलेलं होतं. त्यांच्या निधनामुळे मामबो कुटुंबियांना अतिशय दुःख झालेलं आहे. मामबो समूहातल्या काही लोकांच्या वेचक प्रतिक्रिया इथे देत आहे:

प्रिया साठे: आयुष्य कसं जगावं हे स्वतःच्या जीवनातून शिकवणारे, जगण्याची प्रचंड उमेद असणारे, अफाट समाजकार्य करून सर्वांसाठी एक उदाहरण असणारे, मामबोला स्वतःचा परिवार मानणारे असे मद्दीवार काका देवाघरी गेले. त्यांना भेटता आलं, त्यांच्याशी गप्पा मारता आल्या हे मी माझं भाग्य समजते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

डॉ. सुखमणी रॉय: हरि ॐ तत्सत् 🙏 एका विजीगिषु योध्दयाला वीरगती मिळाली 🙏 एका कृतार्थ कर्तृत्वसूर्याचा अस्त झाला. तुम्ही तर त्याच्या प्रत्येक किरणांच्या साक्षी, सहचरी. काय सांत्वना द्यावी. त्यांच्या कार्याच्या रूपाने ते निरंतर तुमच्यापाशी आहेत. तुम्हीही सतत त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून साथ दिलीत, त्यामुळे ते निश्चिंतपणे प्रारब्धाला सामोरे गेले. त्यांचे पाठबळ तुमच्यासाठी सदैव आहे, या आश्वासनावर विसंबून शोक आवरावा, ही विनंती.ॐ🙏

अभय कुलकर्णी: या समूहात सामील झाल्यापासूनची ही दुसरी वाईट बातमी. इथं इतकं खेळीमेळीचं आणि सकारात्मक वातावरण असताना, बाहेरच्या सगळ्या ताण तणावाचा विसर पडतो. इतक्या जास्त वयाची माणसं सुद्धा इथं सहज खळाळत असताना दिसतात, पण अशा घटनेने अचानक धाडकन जमिनीवर कोसळायला होतं... दुःखाचा ससेमिरा इथंही आहेच याची जाणीव होते. परवाच माझ्या एका पोस्टवर त्यांनी अगदी प्रामाणिकपणे 'असं कसं, इतकं चांगलं वागूनही राजपुत्राचा असा वाईट शेवट ??? मला ही गोष्ट नाही आवडली.' असं नमूद केलं या प्रतिक्रियेचं मला विशेष कौतुक वाटलं...यात खरेपणा होता, यात त्या गोष्टीतली त्यांची involvement होती, उत्कट प्रतिक्रिया देतानाची निरागसता होती... असं खरं व्यक्त होणारी माणसं दुर्मिळ होत चालली आहेत.
माणसा-माणसा मधला ऋणानुबंध असा काहीसा असतो. दूर कुठेतरी असलेली माणसं एका निमित्ताने संपर्कात येतात, तसं हा समूह एक निमित्त !!! त्यानिमित्ताने virtual का होईना भेट झाली पण ती इतकी अल्प काळ असेल असे वाटले नव्हते. सुरेखाजी मद्दीवार यांना हे दुःख पेलण्याचं बळ मिळो.

मिलींद केळकर: एका थोर माणसाला देवाज्ञा. ईश्वर काकांच्या आत्म्याला सद्गती देईलच. ओम शांती..💐💐🙏🙏

सुषमा जोशी: 🙏🙏🙏🙏 त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो 🙏 इतकं उदात्त कार्य केलं आहे की ती लाभणारच आहे. पण ग्रुपवरची अनुपस्थिती, पोकळी जाणवत राहील.

शैलेश देशपांडे: खूप निखळ आणि मनस्वी व्यक्तिमत्व हरपलं. त्यांच्या वागण्यात एक अत्यंत साधेपणा होता. वैद्यकीय सेवेत वाहून घेणे म्हणजे काय हे त्यांच्या कार्यातून सतत जाणवत असायचे. नानाविध मित्रांच्या सहवासात रमायचे ते - त्यांच्या लेखांतील चित्रांतून कायम जाणवायचं. मामबो वर खूप प्रेम केलं त्यांनी. शेवटच्या आजारपणातही त्यांचा उमदेपणा जराही कमी झाला नव्हता. अश्या आनंदयात्रीला निरोप देताना अंतकरण जड होतंय. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो 🙏🙏🙏

भावना जोशी: ओम शांती!!! खूप वेदनेत असतानाही जीवनाचा पूर्ण आनंद घेत असलेला माणूस - A very inspirational soul 🙏

गौतम पंगू: त्यांच्याकडून किती काय काय शिकण्यासारखं आहे - त्यांचं अफाट काम, ऊर्जा, त्रास होत असतानाही सर्वांशी जोडलेलं रहायची प्रवृत्ती, मामबोवरचं प्रेम...त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो 🙏🙏

उमेश वानखडे: दुःखद बातमी! काकांचं कर्तृत्व खरोखर मोठं होतं. कीर्तिरूपे उरावे या उक्तीला जागणारं आयुष्य जगले काका! मरण दारावर ठेपलेल असून सुद्धा सामान्य आयुष्य जगले काका अगदी शेवटपर्यंत. आपण त्यांच्याकडून खूप काही शिकावं असं आदर्श आयुष्य जगले काका! काकांना सद्गती लाभो! सुरेखा काकू, तुम्हाला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो! त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो! ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

शिल्पा केळकर: खरंय. संपलं नाही तर पूर्ण झालं आयुष्य. 🙏 Absolutely inspirational life he lived!🙏 May his soul continue the onward journey with the same fervor. 🙏

मिलिंद डबली: मामबोचा मोठा पाठीराखा होते, काका! शेवटपर्यंत जीवनरस ताजा ठेवला त्यांनी! अशी माणसं विरळाच! ॐ शांती 🙏

अमृता हमीने: एक असामान्य व्यक्तिमत्व हरपले, किती शेवटपर्यंत लिहीत होते, 🙏

राजेश्वरी किशोर: चार वर्षांपूर्वी काका पुण्यात आले तेव्हा त्यांचा 83rd bday होता. खूप मजा आली होती. त्यांच्याकडून कितीतरी घटना ऐकायला मिळाल्या. मृत्यूला इतक्या शांतपणे, हसत, लिहीत सामोरे जाणे, त्यांनी सहजपणे करून दाखवले. असामान्य लढवय्या होते ते.

वेंकटेश कुलकर्णी: मद्दीवार काकांच्या सगळ्या पोस्ट, त्यांचं आठवणीत रमणं, भारताबाहेर राहूनही या देशाशी असलेली नाळ, नेहमीच प्रत्येकाच्या लिखाणावर प्रोत्साहन देऊन संवाद सुरू ठेवण्याची त्यांची इच्छा हे सगळं कालपासून आठवतंय. काकांच्या जाण्यामुळे मन व्यथित झालं. शारिरीक मर्यादा असूनही काका मामबोवर सतत सक्रिय होते. कधीतरी विहंगमवर किंवा भारतात मामबो संमेलनात काका भेटतील असं वाटायचं. काही दिवसांपूर्वीच्या पोस्टमध्ये त्यांच्या आयुष्याशी चाललेल्या संघर्षाची आणि त्यांच्या मनाच्या तयारीची जाणीव झाली होती पण इतक्या लवकर हा प्रसंग येईल असं वाटलं नव्हतं. मामबोचा एक जिंदादिल आता पुन्हा आपल्या आठवणींत संबंध मामबोकरांना गोवणार नाही... काकांना भेटता न आल्याची खंत आयुष्यभर राहील. स्व. मद्दीवार काकांच्या पवित्र पुण्यात्म्यास सद्गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. 🙏🙏

मोहना जोगळेकर: सुरेखाताई, डॉक्टर अतिशय परिपूर्ण जीवन जगले. अनेकांच्या आयुष्याला त्यांनी मार्ग दाखवला. तुमच्या आणि त्यांच्या लेखनामधून तुम्ही सातत्याने आमच्यापर्यंत पोचत होता त्यातून तुम्हा सर्वांचीच तसंच डॉक्टरांच्या कार्याची, त्याला असणाऱ्या तुमच्या साथीची ओळख होत होती. तुम्हा दोघांची मुलाखत घेण्याच्या निमित्ताने मी तुमच्याबद्दलची जी माहिती जमवली ती

भारावून टाकणारी होती. मुलाखतीच्या निमित्ताने zoom वरची भेट कायम स्मरणात आहे राहिल. डॉक्टरांची स्मृती आणि कार्य चिरंतन आहे. या दुःखातून तुम्हा सर्वांना सावरण्याचं बळ मिळो आणि डॉक्टरांच्या आत्म्याला शांती लाभो ही प्रार्थना.

ह्या व्यतिरिक्त सविता देशपांडे, गिरीश गोगटे, डॉ. विजयसिंह पाटील, डॉ. विवेक देशपांडे, ज्योती जोग, मेधा सोवनी, अनंत जोशी ह्यांचेही दुखवटा व्यक्त करणारे संदेश आलेले आहेत.

देव त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो!

**प्रियदर्शन मनोहर**